**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 4, APRIL - 2022 Publication Date: 30/04/2022

DOIs:10.2018/SS/202204005 --:-- Research Article

# कामाच्या ठिकाणी होणारा लिंग भेदभाव: एक ज्वलंत समस्या

**प्रा. डॉ.मंजिरी पाठक**
स.प्राध्यापक, प्रेरणा कॉलेज ऑफ कॉमर्स, नागपूर.
Email:- manjiri1706@gmail.com

**गोषवारा:-** लिंगभेदभावाची सुरूवात होण्यामागील मुख्य कारण म्हणजे जेव्हा समाजात स्त्री पुरूष असा भेदभाव करण्यास सुरूवात होते. स्त्री आणि पुरूष यांना असमानतेची वागणूक देण्यात येते. जर दुस-या शब्दात सांगायचे झाले तर लिंगभेदभाव म्हणजे अशी परिस्थिती जेव्हा पुरूषंना स्त्रियांपेक्षा अधिक दर्जेदार वागणूक देण्यात येते. बहुतांश वेळी व्यावसायिक आपल्या उद्योगात जेव्हा बढतीची वेळ येते तेव्हा बढतीसाठी प्रथम पसंती ही स्त्रीऐवजी पुरूषालाच देण्यात येते. या लिंगभेदभावाला आळा बसवण्यासाठी भारतीय संविधानात अलिकडच्या काळात विविध कायदयांची तरतूद करण्यात आली आहे. विविध कायदे जरी अस्तित्वात असले तरी ख-या आयुष्यात लिंगभेदभाव समजून घेणे फार अवघड कार्य आहे.

**कीवर्डः**- महिला कामगार, लिंग भेदभाव, कायदेविषयक संरक्षण, कामाचे ठिकाण.

## 1. प्रस्तावना:

आजच्या एकविसाव्या शतकात माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्येही समाजात मुल- मुलींमध्ये भेदभाव केला जात आहे. महाराष्ट्र राज्य हे कितीही सुधारलेले किंवा प्रगतीशील जरी असले तरी राज्यामध्येसुद्धा याहून वेगळी स्थिती नाही, हे आपल्या राज्याच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. महाराष्ट्र राज्याची जी लोकसंख्या आहे त्या लोकसंख्येला बघता स्त्रीपुरूषांचे प्रमाण समान नाही म्हणजे स्त्रियांपेक्षा पुरूषांचे प्रमाण अधिक आहे. हा असमतोल निसर्गाने घडविलेला नाही तर लिंगभेद कारणामुळे झालेला आहे. लिंगभेदविरहीत मानव विकास ख अर्थाने साधावयाचा असेल तर स्त्रियांचाही विकास होणे आवश्यक आहे. त्याकरीता मुलींची संख्या वाढणे आवश्यक आहे. म्हणजेच नवजात मुलगी प्रथमतः जिवंत राहिली पाहिजे नंतर तिचे व्यवस्थित भरणपोषण होवून तिला मोकळेपणाने वाढू देवून निवडीचे स्वातंत्र दिले पाहिजे. हे स्वातंत्र उपभोगण्यासाठी सक्षमीकरणाची गरज आहे. स्त्रीला निर्णय स्वातंत्र नसल्यामुळे तिच्या आत्मविकासाचे मार्ग रोखले जातात. यातूनच सुरूवात होते ती लिंगभेदभावाला आरोग्यावर झाले सुरूवात होते ती लिंगभेदभावाला आरोग्यावर झालेल्या परिणामामुळे स्त्री ही कामाच्या ठिकाणी एकाग्र होवू शकत नाही. परिणामी ती पुरूषांच्या तुलनेत जरी जास्त श्रमाचे व जास्त काम करून देखील सुद्धा तिला मिळणारे वेतन हे त्या तुलनेत फार कमी असते हे वास्तव आपल्याला नाकारता येत नाही.

उच्चशिक्षित स्त्री ज्ञान आणि कौशल्य संपादन करून घराबाहेरच घराबाहेरील जबाबदा-या कौशल्यपूर्व रीतीने हाताळू शकते. वर्तमानकाळामध्ये महिलांवर अनेक जबाबदा-या आहेत. नवीन पिढीच्या निर्मितीबरोबर ती अनेक कामांमध्ये सक्रिय सहभाग घेत असते.

अशिक्षित स्त्री माता पिता, पती आणि मुलांवर निर्भर राहते. त्यामुळे ती स्वतःलाच कमी लेखते. शिक्षणामुळे तिच्या ठिकाणी स्वाभिमान निर्माण होतो. आपल्या बुद्धिमतेच्या उत्तुंग झेपेतून ती प्रतिमावंत बनू शकते. बुद्धिमान आणि प्रतिमावंत स्त्रीने जर कुठेही कामाची सुरूवात केली तर ते क्षेत्र, ती संस्था, किंवा कुठलेही ठिकाण हे शिखर गाठल्याशिवाय राहणार नाही. परंतु भारतीय समाजात शिखर गाठल्याशिवाय राहणार नाही परंतु भारतीय समाजात स्त्री - पुरूष हा भेदभाव खूप जास्त प्रमाणात बघयला मिळतो. त्यामुळे समाजातील काही टक्के समाज आजही स्त्री पुरूष भेदभाव केला जातो. त्यामुळे आजही काही स्त्रियांच्या वाटयाला चूल आणि मूलचं आलेले आहे. आजही त्यांना घराच्या बाहेर पडुन कुठलेही काम करण्याची मुभा मिळालेली नाही आणि ज्या करतात त्यांना बरेच ठिकाणी भेदभाव सामोरे जावे लागते.

## 2. लिंगभेदभाव म्हणजे काय ?

अर्ध भार्या मनुष्यस् भार्या श्रेष्ठतमः सखा भार्या मूल गिवर्गस्य भार्या मूल तरिष्यतः! संपूर्ण कुटुंबाचा भार आपल्या शिरावर घेवून कुटंबाच्या उन्नतीकरिता विकासाकरिता झटते ती स्त्री. लिंग व लिंगभाव त्या भिन्न गोष्टी आहेत. लिंग हे

**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 4, APRIL - 2022 Publication Date: 30/04/2022

जन्मतः ठरतं तर लिंगभाव सामाजिक रचनेत घडतो. लिंगभेदावर आधारित सामाजिक रचना म्हणजे लिंगभाव. वेन म्हणते की, कोणत्याही कायदयाचे कधीही भेदभाव हा ओळखल्या जाऊ शकतो. लिंगभेदभाव हा एखादया अनुचित वर्तमानाचे स्वरूप म्हणून परिभाषित केले जाऊ शकते. लिंगभेद म्हणजे एका लिंगाला अनावश्यक महत्व देणे तर दुसरे लिंग कमी लेखणे होय.

**3. समस्या विधान:-**

लिंगभेदभाव ही एक प्रकाराची वर्तणूक म्हणता येईल जी एका व्यक्तिकडून दुस-या व्यक्तिकडे परिवर्तीत होवू शकते. यामध्ये एका गटाचा अर्थात पुरूष हे कामाच्या ठिकाणी आपले वर्चस्व किंवा बुद्धि ही दुस-या गटातील अर्थात स्त्रियांपेक्षा अधिक समजतात. लोकसंख्येच्या 1/3 संख्या ही स्त्रियांची आहे परंतु त्यांना लिंगाच्या आधारावर दुय्यम वागणूक दिली जाते.

**4. अभ्यास उदिद्ष्टे:-**

1) कामाच्या ठिकाणी महिला कामगारांबरोबर लैगिंक भेदभावाची संकल्पना समजून घेणे.
2) कामाच्या ठिकाणी महिला कामगारांशी लैगिंक भेदभावाचे कारण शोधणे.
3) स्त्रीसह लिंग आधारित भेदभाव दुर करण्यासाठी उपाय सुचविणे.

**5. संशोधन पद्धती:-**

दुय्यम संकलित पद्धती, दुय्यम माहिती ही वेगवेगळी लिंगभेदभावावर आधारित पुस्तके, रोजनिशी, नियतकालिके संशोधन लेख आणि इंटरनेट इ. ठिकाणाहून माहितीचे संकलन केलेले आहे आणि या विषयाला प्रस्तुत करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग केला आहे.

**5.1 स्त्री - पुरूष असमानतेची कारणे:-**

1) काही ठिकाणी पुरूषांना स्त्रियांपेक्षा अधिक बलवान हुशार व जास्त चिकाटी असणारे समजले जाते त्यामुळे कामाच्या ठिकाणी पुरूषांची नियुक्ती केली जाते.
2) महिलांबद्दल पुरूषांच्या बरोबरीने काम करण्याच्या क्षमतेबद्दल असणा-या जागरूकतेचा अभाव.
3) पूर्वग्रहित मानसिकता:-
   1) स्त्रियांच्या लैगिंक शोषणाला बाहय करणे.
   2) आपण स्वतःची सुरक्षा स्वतः करू शकतो याबाबत स्त्री स्वतः खात्री देत नाही.
   3) स्त्रियांचा स्वतःबाबत असणारा दुबळा दृष्टिकोन.
   4) पारंपारिक रूढी, प्रथा, परंपरा
   5) कालबाहय नियम
   6) कुटुंबात किंवा समाजात स्त्रीला बालपणापासून अशी शिकवण दिली जाते की तिची सर्व संपत्ती ही तिच्या एकटीच्या मालकीची नाही.
   7) कुटुंबामध्ये कुठलाही निर्णय घेतांना स्त्रीचे स्थान हे नेहमीच दुय्यम असते. कारण प्रथम निर्णय हा पु रूषांचाच असतो. ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

**5.2 स्त्री - पुरूष (लिंगभेदभावाचे) परिणाम:-**

लैगिंक भेदभाव बळी हे त्यांच्यावर झालेल्या अन्यायामुळे त्यांचे मानसिक संतूलन गमावून बसण्याची शकयता असते. टीरानरास रिसर्च सव्हिसच्या मते, कामाच्या ठिकाणी 68 टक्के स्त्रिया हया विश्वास करतात की कामाच्या ठिकाणी लैगिंक भेदभाव हा अस्तित्वात असतो. फेडरल कायदयात स्त्रिया आणि इतर अल्पसंख्यांकांना कामाच्या ठिकाणी भेदभावापासून संरक्षण होते. समान वेतन कायदयाने स्त्रियांपेक्षा जास्त पैसे देण्याची प्रथा बंद केली. जेकबसन यांनी लिहिलेल्या टाका अहवालाप्रमाणे लिंगभेद देखील उत्पादकता कमी होण्यास कारणीभूत ठरणारा महत्वाचा घटक आहे. मनोबल आणि प्रेरणा या नुकसानीस कारणीभूत गोष्टींमध्ये कर्मचा-यांचे लिंगा बद्दल मस्करी यांचा समावेश असू शकतो ज्यात न्यूवता सुचनेसंबंधीचा किंवा लैगिंक स्वरूपाचा आक्षेपार्ह विनोद यांचा समावेश असू शकतो. जर स्त्री आणि पुरूष यांचा विचार करता जर तिने तिच्या कर्तृत्वाने एखादी नोकरी मिळवली असेल तर तेथे मिळणारे वेतन कुठे आणि कसे खर्च करायचे हा सर्वस्वी निर्णय तिचा राहत नाही. तर तो तिला वडील, पती, मुलगा यांची संमती ही घ्यावी लागते.

स्त्रियांच्या कामाचे ठिकाण म्हणजे आजही आम्ही घरच मानतो. या परिस्थितीत स्त्रिया आर्थिकदृष्ट्या अनुत्पादक कामे करतांना दिसून येतात. कारण घरकाम हे आर्थिकदृष्ट्या उत्पादक दृष्टिकोनातून बघितले जात नाही ती सर्व घरची कामे, मुलांची जबाबदारी, वृद्धांची काळजी इ. कामे करत असते. परंतु शेती, व्यवसाय, कंपनी या वेगवेगळया ठिकाणी होणारी तिची मदत ही अदृश्य आणि दुर्लक्षित स्वरूपाची असते. याउलट शहरी भागात स्त्रिया हया डबल नोकरी करतांना दिसून येतात. घर आणि कामाचे ठिकाण हया दोघांचा मेळ तिला जमवावा लागतो परंतु कुटुंबाचा प्रमुख मात्र आजही पुरूषच असतो.

## 6. लिंगभेदभाव वरील उपाय:-

1) आपले सौंदर्य आणि सामथ्र्य आलिंगन: आपल्या विश्वासू व्यक्तिलाच आलिंगन आणि जपण्याचे मार्ग शोधा. तसेच स्त्रियांना ओळख -पुष्टी कार्यक्रमात गोडे पाहिजे. तसेच समर्थनासाठी विश्वासहि मित्र आणि नातेवाईक आणि स्वतःबद्दल आत्मविश्वास असण्या-या लोकांना बोलवा.
2) स्वतःसाठी उभे राहतांना इतरांना कळू दया की त्यांचे शब्द आणि कृतींनी आपणास आणि आपल्याबद्दल काळजी व्यक्त केलेल्यांना कसे प्रभावित केले. आपल्या अधिकारांसाठी दिलेला लढा ही एक समस्या आहे. हयाची जाणीव निर्माण करण्याची गरज आहे. आपल्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींना संपर्क करा.
3) अभ्यासकांनी हे दर्शविले आहे की, लैगिंक भेदभाव हे मादक द्रव्याच्या गैरवापरासाठी वाढीव जोखमीशी निग डीत आहे. आणि महिलांचे आरोग्य ठरवण्यासाठी एक महत्वपूर्ण घटक आहे. होमोफोबियामध्ये काही लोकां ना नैराश्य, चिंता आत्महत्या हया गोष्टींचा धोका असतो.
4) कायदेशीर ज्ञान, आणि शिक्षित कायदेशीर ज्ञान या बाबींकडे जर लक्ष दिले तर स्त्री -शिक्षणामुळे लिंगभेदभावामुळे आळा बसण्यास मदत होईल.
5) वेगवेगळया गुन्हयांबद्दल महिलांमध्ये जागरूकता, आत्मसन्मान आणि संरक्षण हयाबाबत माहिती जाणून घ्यावी.

## 7. लिंगभेदभावावरील निष्कर्ष:-

सरकार आणि छळव् यांनी बनविलेले कायदे हे पुरेसे आहेत असे या संशोधनावरून वाटत नाही तर काही सामाजिक संस्थांनी पुढाकार घेवून जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. आणि कायदयामध्ये मोठा बदल आणि पुरूषंच्या मानसिकतेत बदल, सामाजिक मूल्यांची जाण आणि स्त्रियांबद्दल लिंगभेदभावाच्या बाबतीत सामाजिक समानता आखली गेली पाहिजे. तसेच स्त्री - पुरूष असमानता यावर प्रभावी अमंलबजावणी करून स्त्री -पुरूष भेदभावाला आळा बसवणे गरजेचे आहे.

## संदर्भसुची:-


1. Buckley, J. E. Pay differences between men and women in the same job. *Monthly Labor Review*, 1971, *94*(November), 36–39.Google Scholar
2. Adhikari S. (April, 2014) Impact of Gender Discrimination at workplace.
3. American Bar Association Commission on Women in the Profession . 2006. Visible invisibility: Women of color in law firms. Chicago: American Bar Association. Google Scholar
4. Karuna Gokhle, Rajhans Prakashan Ltd. (January 1, 2011)
5. Dr. Gitali Mandakini, Stree Prashna Sodavatana, Dilipraj Prakashan Pvt.Ltd.
6. Amar D. Balasaheb, N. Pratapsinghs, P(Dec, 2010) Gender Sensitization. The Bias and women victimization in India. Multidisciplinary International research journal, Vol,1, Issue 1.